# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २२/०७/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. नरखेड :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. ४२५/२० कलम ३७६, ३७६(२)(i)(j) ४५२ भादंवी सह.क. ४, ६ पोक्सो सह.क. 3(1)(w)(i)(ii),3(2),5(a),3(2)(5) sc/st act कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १७/११/२०२० चे १४/०० वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी ही दुपारी घरी हजर असताना फिर्यादीचे घरा शेजारी राहणारा **आरोपी नामे– प्रेमलाल रामचंद्र कळंबे वय ३० वर्ष, रा. बेलोना ता. नरखेड जि. नागपुर** याने पिडीतेचे घरात बेकादेशीररित्या प्रवेश करून घराला आतुन कडी लावुन मी तुझ्यावर प्रेम करतो असे म्हणुन पिडीतेच्या इच्छेविरूध्द बळजबरीने संभोग केला. पिडीता ही रडत असताना घरा शेजारी राहणाऱ्या महीलेने दरवाजा ठोकला असता आरोपी हा पळुन गेला. पिडीता ही अनुसुचित जाती जमातीची असल्याचे आरोपीस माहीत असतानांही त्याने पिडीता हिचेवर शारीरीक अत्याचार केला.

सदर प्रकरणाचे तपास उपविभागीय पोलीस अधिकारी नागेश जाधव काटोल विभाग काटोल यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी जे –१३ श्री जहीर अब्बास शेख सा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २२/०७/२०२४ रोजी मा. डी जे –१३ श्री जहीर अब्बास शेख सा. यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात १) कलम ४ पोक्सो ॲक्ट मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/–रू. दंड ,दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास २) कलम ८ पोक्सो ॲक्ट मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ महीने साधा कारावास ३) कलम ४५२ भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी प्रशांत साखरे सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ गणेश पाल पोस्टे नरखेड यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर